# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८
## वैद्यकीय मुख्य कार्यालय — धन्वंतरी कक्ष
## सभावृत्तांत

दिनांक — १०/१०/२०२३ वेळ — सायं.०६.०० वा.

विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेतील व सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी वैद्यकीय विमा लागू करणेबाबत..

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेतील व सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांचेसाठी वैद्यकीय विमा लागू करणेकामी मंगळवार, दि.१० ऑक्टोबर, २०२३ रोजी सायं.६.०० वा. मा.आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली मा.आयुक्त यांचे दालनात बैठक आयोजित केली होती. सदरचे बैठकीस खालील समिती अधिकारी व विमा कंपनीचे अधिकारी उपस्थित होते.

| अ.क. | अधिकारी नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री.शेखर सिंह | आयुक्त तथा अध्यक्ष |
| २ | श्री.विजय खोराटे | अतिरिक्त आयुक्त तथा उपाध्यक्ष |
| ३ | डॉ.लक्ष्मण गोफणे | आरोग्य वैद्यकीय अधिकारी तथा कार्याध्यक्ष |
| ४ | डॉ.अभयचंद्र दादेवार | अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी |
| ५ | श्री.प्रवीण जैन | मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा खजिनदार |
| ६ | श्री.प्रमोद भोसले | मुख्य लेखापरिक्षक तथा सदस्य |
| ७ | श्री.विठ्ठल जोशी | उप आयुक्त सामान्य प्रशासन तथा सदस्य |
| ८ | श्री.हितेश चंद्राकर | प्रतिनिधी, दि न्यु इंडिया एशोरंन्स कं.लि |
| ९ | श्री.ललित खरबंदा | प्रतिनिधी, दि न्यु इंडिया एशोरंन्स कं.लि |
| १० | श्री.संजयकुमार सिन्हा | प्रतिनिधी, के.एम.दस्तूर सल्लागार |

समिती पुढील मुद्यांवर खालीलप्रमाणे चर्चा करणेत आली —

| विषय क्र. | विषय | निर्णय |
|---|---|---|
| १ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व अधिकारी / कर्मचारी यांना वैद्यकीय विमा लागू करणेबाबत. | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील अधिकारी/ कर्मचारी यांना वैद्यकिय विमा कार्यान्वीत करणेकामी विमा कंपनी सोबत झालेल्या करारनाम्यातील अटी शर्तीनुसार व प्रिमीयम रकमेवर विमा कंपनी कामकाज करणेस तयार आहे किंवा कसे? याबाबत विमा कंपनीस विचारणा करणेत आली होती त्यास अनुसरुन विमा कंपनीचे अधिकारी यांनी सदर बाबत मा.आयुक्त सो यांचेशी बैठकीसाठी वेळ मागविली होती. त्यानुसार दि.१०/१०/२०२३ रोजी मा.आयुक्त सो यांचे दालनात सदर विषयावर सविस्तर चर्चा करणेत आली व चर्चेअंती खालील प्रमाणे निर्णय घेणेत आला<br>- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांना विमा लागू करणेकामी मे. दि न्यु इंडिया एशोरंन्स कं.लि. सोबत दि.०६/०३/२०२० रोजी करारनामा करणेत आला आहे. सदर करारनामा हा ३ वर्ष कालावधीसाठी करणेत आलेला आहे.<br>- तसेच सदर कामाचा कार्यारंभ आदेश दि.०४/०१/२०२१ नुसार देणेत आलेला आहे. परंतु मा.औद्योगिक न्यायालय, पुणे येथे विमा सुरु करणेत येऊ नये याकामी कर्मचारी महासंघाने दावा दाखल केलेला |

| विषय क्र. | विषय | निर्णय |
| --- | --- | --- |
| | | आहे. त्यामुळे विम्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी अद्यापही झालेली नाही.<br>- विमा कंपनीस दि.३०/०८/२०२३ रोजीचे धन्वंतरी समितीचे घेतलेल्या निर्णयानुसार करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार काम करणेस तयार आहात का? याबाबत विचारणा करणेत आलेली होती.<br>- विमा कंपनीचे अधिकारी/प्रतिनिधी यांनी करारनाम्यामधील मुद्दा क्र.११ बाबत काही अंशी बदल करणेबाबत कळविले होते, त्यानुसार सदर बैठकीमध्ये मा.आयुक्त सो यांनी सद्यस्थितीत RFP व करारनामा यामध्ये बदल करता येणार नाही असा निर्णय दिलेला आहे.<br>- तसेच मुळ करारनाम्यानुसारच विमा कंपनीने १ वर्ष कालावधीसाठी विमा कार्यान्वित करावा व तद्नंतर बिलांची संख्या व रक्कम यांची वस्तुस्थिती पाहून पुढील वर्षाकरीता मुदतवाढीबाबत अलहिदा निर्णय घेणेत येईल.<br>- विमा कंपनीने करारनाम्यातील अटी व शर्तीनुसारच विमा कार्यान्वीत करणेकामी लेखी सहमती दर्शविल्यानंतर मा.औद्योगिक न्यायालय, पुणे येथे विमा सुरु करणेत येऊ नये याकामी प्रलंबित असलेला दावा मागे घेणेकामी अध्यक्ष, कर्मचारी महासंघ यांना लेखी पत्रान्वये कळविणेत यावे. तसेच दावा मागे घेतले नंतर वैद्यकीय विमा सुरु करणेकामी सुधारित परिपत्रक निर्गत करणेत यावे. |

यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

(डॉ.लक्ष्मण गोफणे)
आरोग्य वैद्यकीय अधिकारी
कार्याध्यक्ष

(डॉ.अभयचंद्र दादेवार)
अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त तथा सदस्य

(प्रवीण जैन)
मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा खजिनदार

(प्रमोद भोसले)
मुख्य लेखापरिक्षक तथा सदस्य

(विजय खोराटे)
अतिरिक्त आयुक्त तथा उपाध्यक्ष

(शेखर सिंह)
आयुक्त तथा अध्यक्ष